विस्तार अधिकारी (कृषि) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना
तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती
योजनेचे लाभ देणेबाबत

जिल्हा परिषद, अहिल्यानगर
कृषी विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. : कृषि/आस्था/४८/२०२६
दिनांक : स्वाक्षरीखाली नमुद केलेनुसार

संदर्भ : १. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,
दिनांक ०२/०३/२०१९
२.वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.वेपुर११२५/प्र.क्र.०१/सेवा ९ दिनांक २ जून २०२५
३.ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.वेतन-२०२५/प्र.क्र.१३८(ईक्र-१२७६१८१)आस्था ४
दिनांक १३ ऑक्टोबर २०२५
४.गठीत निवड समितीचे इतिवृत्त, दिनांक ०२/०१/२०२६.

उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगांतर्गत तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे-बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड पे रु. ५४००/- यास समकक्ष) कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली आहे.

सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी व शर्ती तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेबाबत गठीत समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करून, उपरोक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विस्तार अधिकारी (कृषि) या गट क मधील संवर्गातील कर्मचा-यांना खालील तपशिलानुसार तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतर पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन मॅट्रीक्समधील स्तंभ ७ मध्ये दर्शविलेल्या पदाचे वेतनस्तर खालील अटी व शर्तीना अधिन राहून मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | कार्यालयाचे नाव | पहिला लाभ मंजूर दिनांक | दुसरा लाभ मंजूर दिनांक | तिसरा लाभ मंजूर दिनांक | सु.से. आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर केलेल्या पदाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री मनोज रंगनाथ बनकर | पंचायत समिती, श्रीगोंदा | - | - | ०६-०९-२०२४ | सहाय्यक गट विकास अधिकारी |
| २ | श्री बाळासाहेब पोपट कांडेकर | पंचायत समिती, पाथर्डी | - | - | ०५-०९-२०२४ | सहाय्यक गट विकास अधिकारी |
| ३ | श्री वसंत जनार्दन राऊत | पंचायत समिती, राहुरी | - | - | ०२-०९-२०२३ | सहाय्यक गट विकास अधिकारी |
| ४ | श्री मदन उत्तम शेवाळे | पंचायत समिती, संगमनेर | ०३-०२-२०१५ | - | - | कृषी अधिकारी (जि.प.) गट-ब (कनिष्ठ) (राजपत्रित) |
| ५ | श्री दिगंबर मारुती भांड | पंचायत समिती, शेवगांव | ०४-०२-२०२५ | - | - | सहाय्यक गट विकास अधिकारी |
| ६ | श्रीम मनिषा किसनराव शिंदे | पंचायत समिती, पारनेर | ०६-०२-२०२५ | - | - | कृषी अधिकारी (जि.प.) गट-ब (कनिष्ठ) (राजपत्रित) |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | पदाचे नांव | ६ वेतन आयोगातील वेतन बँड | ७ व्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र विकास सेवा वर्ग २ (सहाय्यक गट विकास अधिकारी) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | एस १६: ४४९००-१४२४०० |
| २ | महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग २ (कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) गट ब (कनिष्ठ) (राजपत्रित) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | एस १५ : ४१८००-१३२३०० |

योजनेच्या अटी व शर्ती

१. संबंधित कार्यालयप्रमुख यांनी कर्मचाऱ्यांचे सलग सेवेचे दाखले, अर्हता परीक्षा, संगणक परीक्षा, स्थायित्व प्रमाणपत्रे, जात वैधता प्रमाणपत्रे, मत्तावदायित्वे विवरणपत्रे, चौकशीबाबतची व इतर सादर केलेल्या दस्तऐवजांनुसार संबंधित कर्मचाऱ्यांना लाभ अनुज्ञेय आहे. याबाबतची खात्री संबंधित खातेप्रमुखांनी करून वेतन निश्चिती करावी.

२. सातव्या वेतन आयोगामधील वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस २० पर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू राहील. म्हणजेच संबंधित कर्मचारी वेतन स्तर २१ मध्ये वेतन आहरित करू लागतील तेव्हा त्यांना या योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

३. या योजनेखाली पात्र कर्मचाऱ्यांना संपूर्ण सेवा कालावधीत पात्रतेनुसार फक्त तीन वेळा लाभ मंजूर करण्यात येईल.

४. सदर योजनेचा लाभ हा कर्मचाऱ्यांना संपूर्ण सेवा कालावधीत (म्हणजेच ३० वर्ष नियमित व सलग सेवा केलेल्या) दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना एक लाभ अनुज्ञेय राहील. ३० वर्षाच्या नियमित व सलग सेवेत कार्यात्मक पदोन्नती व लाभांची संख्या तीनपेक्षा जास्त नसावी याची खात्री संबंधित कार्यालयप्रमुखांनी करावी.

५. संपूर्ण सेवा कालावधीत तीन कार्यात्मक पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा एकही लाभ अनुज्ञेय नाही.

६. सदर योजनेअंतर्गत पदोन्नती साखळीतील पदोन्नतीच्या पदाचा वेतन स्तर मंजूर करण्यात येत असल्यामुळे त्यासाठी पदोन्नतीच्या पदाचे सर्व निकष पूर्ण करणे आवश्यक राहील.

७. यापूर्वी ज्या कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती अथवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, त्यांचे ते लाभ या योजनेअंतर्गत प्रकरणपरत्वे पहिला व दुसरा लाभ समजण्यात येतील.

८. विवक्षित सेवा कालावधीनंतर संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक तत्सम उच्च वेतन संरचनेचा मंजूर करण्यात आलेला/येणारा लाभ हा योजनेखालील पहिला लाभ समजण्यात येईल.

९. ज्या कर्मचाऱ्यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाचा विवक्षित सेवा कालावधीनंतर त्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ न होता अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतन संरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ म्हणून मंजूर करण्यात येईल.

१०. ज्या कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१६ ते ०२/०३/२०१९ या कालावधीत यथास्थिती १२ किंवा २४ वर्षांच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, त्यांचे यापूर्वीचे १२/२४ वर्षांचे लाभाचे आदेश रद्द करण्यात येतील व तीन लाभांच्या योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ सुधारीत करून मंजूर करण्यात येतील. त्यानुसार असुधारीत लाभाची रक्कम सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करून फरकाची रक्कम देय असल्यास अनुज्ञेय करावी.

११. ज्या कर्मचाऱ्यांची नियमित व सलग सेवेची १० वर्षे दि. ३१/१२/२०१५ पूर्वी किंवा दि. ३१/१२/२०१५ रोजी पूर्ण होतील, त्यांना या योजनेअंतर्गत तीन लाभांच्या योजनेचा पहिला लाभ दि. ०१/०१/२०१६ रोजी पात्रतेनुसार मंजूर केला जाईल.

१२. ज्या कर्मचाऱ्यांची २० वर्षांची सेवा ही दि. ०१/०१/२०१६ रोजी किंवा त्यानंतर पूर्ण होईल, त्यांना तिसरा लाभ हा दुसऱ्या लाभापासून पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

Scanned with OKEN Scanner

१३. दि. ०१/०१/२०१६ नंतरच्या पदोन्नतीच्या वेळी म.ना.से. (सुधारीत वेतन) नियम, २०१९ मधील नियम क्र. १३ नुसार वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय करण्यात येईल.

१४. दि. ०१/०१/२०१९ पूर्वी सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना दि. ०१/०१/२०१९ नंतर तीन लाभांच्या योजनेतील यथास्थिती पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतन श्रेणीत अनुज्ञेय राहील.

१५. महाराष्ट्र विकास सेवा वर्ग २ (सहाय्यक गट विकास अधिकारी) विकल्प दिलेल्या कर्मचा-यांची वेतननिश्चिती करताना उपरोक्त शासन निर्णय दिनांक २ जून २०२५ मधील अटी व शर्तीचे पालन करणेत यावे.

१६. तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि. ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात आली असल्याने, जे कर्मचारी यापूर्वीच्या योजनेनुसार लाभ घेऊन दि. ०१/०१/२०१६ पूर्वी सेवानिवृत्त/मयत झाले आहेत, त्यांना सुधारित योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तथापि दि. ३१/१२/२०१५ पूर्वी लाभ प्राप्त करून दि. ०१/०१/२०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त/मयत झालेल्या कर्मचाऱ्यांना पात्रतेनुसार पुढील लाभ अनुज्ञेय राहील.

१७. तीन लाभांच्या योजनेअंतर्गत लाभ मंजुरीसाठी गोपनीय अहवाल प्रतवारीचा निकष सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयानुसार राहील.

१८. कार्यात्मक पदोन्नती नाकारलेली असल्यास अथवा अपात्र ठरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यास भविष्यात पात्र ठरल्यास, कार्यात्मक पदोन्नती स्वीकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षांच्या सेवेनंतर लाभ अनुज्ञेय राहील.

१९. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांस जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

२०. लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारल्यास लाभ काढून घेण्यात येतील, मात्र वसूली करण्यात येणार नाही.

२१. विस्तार अधिकारी (कृषी) यांचे गट-ब मधील पदोन्नती विकल्पानुसार वेतन श्रेणी लागू राहील.

२२. संबंधित कर्मचाऱ्यांना दोन अपत्यांची अट लागू राहील. त्यापेक्षा जास्त अपत्ये असल्यास लाभ अनुज्ञेय राहणार नाही व शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

२३. भविष्यात वेतनश्रेणी बाबत अतिप्रदान आढळल्यास वसूली करण्याची जबाबदारी खातेप्रमुखांची राहील व त्याबाबत हमीपत्र घेण्यात यावे.

२४. संबंधितांकडून करारनामा करून घेणे आवश्यक राहील.

२५. सदर आदेशाची नोंद कर्मचाऱ्यांच्या मूळ सेवा पुस्तकात घेऊन तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र 202603240900007 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 24-03-2026 13:46:04

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रति,

सबंधित कर्मचारी
यांना कार्यालय प्रमुखामार्फत रवाना

प्रत :गट विकास अधिकारी, पंचायत समिती ,श्रीगोंदा, पाथर्डी, राहुरी, संगमनेर, शेवगांव, पारनेर

१. मा. मुख्य ले खा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर

२. निवड नस्ती

Scanned with OKEN Scanner